**: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७/२०२४ मधील नि. ३८ खालील आदेश –:**

(दिपा चंद्रशेखर जाधव व.४ विरुध्द सुकी डेव्हलपर्स देवाकी रॉयल व.६)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस या कामी विहीत मुदततीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन असे की, प्रतिवादी क्र. ४ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा किरकोळ स्वरुपाचा असून न्यायपुर्ततेसाठी क्षमापित होणे गरजेचे आहे. सबब, प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस १ वर्षे ५ महिने १३ दिवसांचा विलंब झालेला आहे. तरी न्यायाचे कारणास्तव सदरचा विलंब माफ होऊन मिळवा अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, सदरचा दावा हा मयताविरुध्द दाखल करण्यात आलेला आहे, त्यामुळे दावा चालण्यासारखा नाही. सदरचा दावा हा जाणून बुजून मयता विरुध्द दाखल केलेला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

**०५.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक १०/११/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे कायदेशीर प्रतिनिधीबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु, वारस दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, हक्कप्रस्थापनाहोऊन मिळणेसाठी व प्रतिवादीविरुध्द कायम ताकिदीकरीता दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादीचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा विलंब माफ करणेकरीता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दिलेला असल्यामुळे त्याच्यावर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: आदेश :–**

१. सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये ३००/– (रुपये तीनशे मात्र ) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी नं.४ यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.05.07 18:01:24 +0530

दिनांक– ०७/०५/२०२५ (प.रा.ढोरे )

सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.